महाराष्ट्रातील क्रौर्याच्या घटना थांबवा- भुजबळ

मुंबई (प्रतिनिधी)– गेल्या काही दिवसांत बीड, परभणी, लातूर, जालना येथे माणुसकीला काळिमा फासणाऱ्या क्रौर्य घटना आहे. संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्राची ही संस्कृती नाही. विकासाला मानवी चेहरा पाहिजे. पण माणसाला जर जनावरासारखे मारले जात असेल तर हा विकास कुणासाठी करायचा? असा सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी बुधवारी विधानसभेत राज्यात घडलेल्या क्रूर घटनांबद्दल चिंता व्यक्त केली. महाराष्ट्रातील क्रौर्याचे प्रकार महाराष्ट्राला शोभादायक नाहीत. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी पुढाकार घेऊन राज्यात घडू लागलेल्या क्रौर्याच्या घटना थांबवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही भुजबळ यांनी केले.

विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावर काल चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना भुजबळ यांनी बीड, परभणी, लातूर, जालना येथे घडलेल्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली. बीडच्या घटनेत ज्यांनी आवाज उठवला त्यांनी परभणीच्या घटनेत पोलिसांना माफ करण्याची भूमिका घेतली. परभणीत पोलीस कोठडीत मृत्यू पावलेला सोमनाथ सूर्यवंशी हा दलित, मागासवर्गीय समाजाचा होता म्हणून पोलिसांना माफ करायचे काय? असा सवाल करत भुजबळ यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर निशाणा साधला. संपूर्ण महाराष्ट्र आपला आहे. त्यामुळे परभणीच्या घटनेत कारवाई करणार नाही काय? अशी विचारणा त्यांनी केली.

भुजबळ यांनी यावेळी अंगावर काटे आणणाऱ्या जालना आणि लातूर जिल्ह्यात घडलेल्या घटनांचा उल्लेख केला. लातूरला धनगर समाजाच्या तरुणाची शिवमंदिरात गेला म्हणून हत्या करण्यात आली. जालन्यात कैलास बोराडे या तरुणाला तप्त सळईचे चटके देण्यात आले. या घटनांमध्ये मला सरकार, पोलिसांना दोष द्यायचा नाही. मात्र, या कुठल्या शक्ती आहेत, या शोधून काढण्याची गरज आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करून या घटना थांबणार नाहीत. त्यामुळे अशा घटना थांबविण्यासाठी विधानसभा अध्यक्षांनी पुढाकार घेऊन सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलवावी. या बैठकीत सर्वपक्षीय नेते, पत्रकार, लेखक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील नेत्यांना निमंत्रित करावे. आपण औरंगजेबचा निषेध करतो पण या महाराष्ट्रातील औरंगजेबीपणा कसा कमी होईल यासाठी प्रयत्न करावा आणि महाराष्ट्रातील क्रौर्य संपुष्टात आणा, अशी मागणी भुजबळ यांनी केली.

जालनातील घटनेत आरोपींवर मकोका लावण्याची सूचना : शिंदे

दरम्यान, जालना जिल्ह्यातील भोकरदनमधील कैलास बोराडे यांना झालेल्या मारहाणीची घटना दुर्देवी आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या घटनेतील गुन्हेगारांना पाठीशी न घालता त्यांना मकोकाफ लावण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. या घटनेच्या संदर्भात मी जालना पोलीस अधीक्षकांशी बोललो आहे. बोराडे यांना झालेली मारहाण अतिशय अमानूष आहे. त्या घटनेचा व्हिडीओ बघितल्यावर अंगावर शहारा येतो. मारहाणीत जखमी झालेल्या बोराडे यांना घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मी त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यास सांगितले. त्यानुसार त्यांच्यावर आता उपचार सुरू आहेत. त्यांच्या उपचाराचा खर्चही केला जाणार आहे. मी त्यांची विचारपूस केली असून सरकार तुमच्या पाठीशी असल्याची ग्वाही दिली आहे. या घटनेतील गुन्हेगारांना अजिबात पाठीशी घालणार नाही. त्यांना मकोका लावण्याची प्रक्रिया गृह विभागामार्फत करण्यात येईल, असे शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ७६१.१९ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन

अहिल्यानगर जिल्ह्यात १०८.१५ लाख टन उसाचे गाळप

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– राज्यात यंदाच्या गळीत हंगामात ०३ मार्च २०२५ अखेर एकूण २०० साखर कारखाने सुरू असून या कारखान्यांनी ८१२.१७ लाख टन उसाचे गाळप आणि ७६१.१९ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे, असे साखर आयुक्तालयातर्फे प्रसिद्धीस दिलेल्या अहवालातून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्याचा एकूण सरासरी साखर उतारा ९.३७ टक्के आहे.

राज्यात एकूण ९२ साखर कारखान्यांनी आपला गाळप हंगाम समाप्त केला आहे. यामध्ये कोल्हापूर विभागातील १६, पुणे विभागातील १०, सोलापूर विभागातील ४०, छत्रपती संभाजीनगर विभागातील ६, अहिल्यानगर विभागातील १० तसेच नांदेड विभागातील १० कारखान्यांचा समावेश आहे.मागील हंगामात याच काळात २०७ साखर कारखाने सुरु झाले होते. यात १०३ सहकारी तसेच १०४ खाजगी कारखान्यांचा समावेश होता. या कारखान्यांनी ९४७.७८ लाख टन उसाचे गाळप करून ९५१.७९ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले होते. राज्याचा एकूण सरासरी साखर उतारा १०.०४ टक्के इतका होता. एकूण ३६ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम समाप्त केला होता.

कोल्हापूर विभागात ४० कारखान्यांनी १९८.०५ लाख टन उसाचे गाळप केले असून, २१७.८६ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. या विभागात राज्यातील सर्वाधिक ११ टक्के साखर उतारा आहे. विभागातील १६ साखर कारखान्यांचा गाळप हंगाम समाप्त झाला आहे. पुणे विभागात ३१ कारखान्याकडून १९०.२४ लाख टन उसाचे गाळप आणि १८०.३२ लाख क्विंटल साखर उत्पादन झाले आहे. साखरेचा उतारा सरासरी ९.४८ टक्के आहे. विभागातील १० साखर कारखान्यांचा गाळप हंगाम समाप्त झाला आहे.

सोलापूर विभागात ४५ कारखान्यांनी १२९.८३ लाख टन उसाचे गाळप करून १०५.१८ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. विभागाचा साखर उतारा ८.१ टक्के आहे. विभागातील ४० साखर कारखान्यांचा गाळप हंगाम समाप्त झाला आहे. अहिल्यानगर विभागात २६ कारखान्यांनी १०८.१५ लाख टन उसाचे गाळप केले आहे. एकूण ९४.७९ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले असून त्याचा उतारा ८.७६ टक्के आहे. या विभागातील ६ साखर कारखान्याचा गाळप हंगाम समाप्त झाला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात २२ कारखान्यांनी ७८.२८ लाख टन उसाचे गाळप केले आहे. त्यांनी ६१.९१ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. या विभागाचा उतारा ७.९१ टक्के आहे.या विभागातील १० साखर कारखान्याचा गाळप हंगाम समाप्त झाला आहे.

नांदेड विभागात २९ कारखान्यांनी ९४.५६ लाख टन उसाचे गाळप केले असून ९.५९ टक्के साखर उताऱ्यासह ९०.७ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. या विभागातील १० साखर कारखान्यांचे गाळप बंद झाले आहे. अमरावती विभागात ४ साखर कारखान्यांनी गाळप सुरू केले असून त्यात १ सहकारी आणि ३ खाजगी कारखान्यांचा समावेश आहे. या कारखान्यांनी १०.११ लाख टन उसाचे गाळप केले असून, ८.९३ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. या विभागाचा उतारा ८.८३ टक्के आहे. नागपूर विभागात ३ खाजगी कारखाने सुरू असून त्यांनी २.९५ लाख टन उसाचे गाळप करून १.५ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. या विभागाचा साखर उतारा राज्यात सर्वात कमी ५.०८ टक्के इतका आहे.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांच्याविरोधात अविश्वासाचा प्रस्ताव

मुंबई (प्रतिनिधी)–नवी दिल्लीत पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात ठाकरे गट आक्रमक झाला आहे. महाविकास आघाडीकडून आज विधान डॉ. गोऱ्हे यांच्याविरोधात अविश्वासाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सभागृहाचा विश्वास गमावल्याने त्यांना उपसभापतिपदावरून दूर करण्यात यावे, अशी मागणी या प्रस्तावाद्वारे विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे.

विधान परिषद सदस्यांच्या पक्षांतराच्या मुद्द्यावरून डॉ. गोऱ्हे यांनी स्वतःला दूर ठेवले होते. मात्र, साहित्य संमेलनातील वादग्रस्त विधानानंतर त्या पुन्हा एकदा ठाकरे गटाच्या निशाण्यावर आल्या आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाल्यापासून त्या आजारपणामुळे विधान परिषद सभागृहात उपस्थित राहिलेल्या नाहीत. अशातच आज विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विरोधकांच्या वतीने राम शिंदे यांच्याकडे डॉ. गोऱ्हे यांच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्ताव दिला. या प्रस्तावावर महाविकास आघाडीच्या विधान परिषद सदस्यांच्या सह्या आहेत. महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सभागृहाचा विश्वास गमावला असल्याने त्यांना उपसभापती पदावरून दूर करण्यात यावे, अशी मागणी विरोधकांकडून करण्यात आली आहे.

प्रस्ताव आणायला उशीर झाला– उद्धव ठाकरे

दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी या ठारावावर आपली भूमिका स्पष्ट करताना, हा अविश्वास प्रस्ताव आणायला आमच्याकडून खरा उशीरच झाल्याचे सांगितले. आतापर्यंत त्या निलंबित व्हायला हव्या होत्या. अविश्वासाचा प्रस्ताव आणल्यानंतर याच अधिवेशनात चर्चा होणे अपेक्षित असते. त्यामुळे हा प्रस्ताव ज्या कारणांसाठी आणला आहे ती कारणे समोर येतीलच.

राहुल गांधींना न्यायालयाने ठोठावला दंड

लखनऊ– उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊ येथील न्यायालयाने लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना २०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. राहुल गांधी यांनी सावरकरांवर वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यावर न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सतत सुनावणीला गैरहजर राहिल्याबद्दल न्यायालयाने हा दंड ठोठावला आहे. तसंच १४ एप्रिलपर्यंत न्यायालयात कोणत्याही परिस्थिती हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

वकील नृपेंद्र पांडे यांनी २०२२ मध्ये विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता (उठझउ) च्या कलम १५६ (३) अंतर्गत तक्रार दाखल केली होती. १७ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्रातील अकोला येथे पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी सावरकरांना ब्रिटिशांचे सेवकफ आणि पेन्शनधारकफ म्हटलं होतं, असा आरोप वकील नृपेंद्र पांडे यांनी तक्रारीत केला होता. त्यानंतर न्यायालयाने राहुल गांधींना समन्स बजावले होते. तक्रारदार नृपेंद्र पांडे म्हणाले की, समाजात द्वेष आणि द्वेष पसरवण्याच्या उद्देशाने हे विधान देण्यात आलं होतं. यासोबतच पत्रकार परिषदेत पत्रकारांना पत्रके देखील वाटण्यात आली.

सोनं स्वस्त होणार? सरकारने उचललं मोठं पाऊल

नवी दिल्ली– सोने आणि चांदीबाबत केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने सोने आणि चांदीच्या आयात आधारभूत किमती अर्थात बेस इम्पोर्ट प्राइसमध्ये कपात केली आहे.

सोन्याच्या बेस इम्पोर्ट प्राइसमध्ये ११ डॉलरची कपात (नवे दर – ९२७ डॉलर प्रति १० ग्रॅम) आणि चांदीच्या बेस इम्पोर्ट प्राइसमध्ये १८ डॉलरची कपात (नवे दर –१०२५ डॉलर प्रति किलो) करण्यात आली आहे.

यापूर्वी गेल्या महिन्यात फेब्रुवारीमध्ये सरकारने चांदीच्या बेस इम्पोर्ट प्राइसमध्ये ४२ डॉलरची आणि सोन्याच्या बेस इम्पोर्ट प्राइसमध्ये ४१ डॉलरची वाढ केली होती. याबाबत सेंट्रल बोर्ड ऑफ इंडायरेक्ट टॅक्सेस आणि कस्टम्सने माहिती दिली होती.

सरकार सोने आणि चांदी दोन्हींसाठी बेस इम्पोर्ट प्राइसचे पुनरावलोकन आणि अपडेट दर १५ दिवसांनी करत असते. हे दर भारतामध्ये आयात केलेल्या सोने आणि चांदीवर आकारल्या जाणाऱ्या शुल्काच्या कॅल्क्युलेशनसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. ही शुल्क किंमत ही आधारभूत किंमत म्हणून वापरली जाते, म्हणजेच याच किमतीच्या आधारे सोने आणि चांदीच्या आयातीचे मूल्य ठरवले जाते आणि या किमतीच्या आधारावरच दोन्ही धातूंवर आयात शुल्क लागू केले जाते. बेस इम्पोर्ट प्राइसमध्ये झालेल्या कपातीमुळे भारतात सोन्याची आयात काही प्रमाणात स्वस्त होऊ शकते, ज्याचा फायदा येत्या काळात ग्राहकांना मिळू शकतो.

चीननंतर भारत दुसरी मोठी बाजारपेठ–

चीननंतर सर्वाधिक सोने भारतात वापरले जाते. भारत आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सोने आयात देखील करतो. भारत सोन्याचा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा आयातदार आणि उपभोक्ता आहे. वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये सोन्याची आयात ३०% वाढून ४५.५४ अब्ज डॉलर झाली होती, तर वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये ही आयात ३५ अब्ज डॉलर होती. मात्र, गेल्या वर्षी मार्च महिन्यात आयातीमध्ये घट झाली होती.

पान १ वरुन

प्रतिज्ञापत्राची ५०० रुपयांची...

विद्यार्थी आणि पालकांचा ही सर्व प्रमाणपत्र लागतात. पण आता या प्रतिज्ञापत्रकांसोबत भरावे लागणारी ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी आता माफ करण्यात आली आहे.

लाडक्या बहिणींना २१००...

करण्यात येत आहे. कोणत्याही योजनेत लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यानुसार ज्या लाभार्थी महिला निकषांची पूर्तता करीत नाहीत त्यांना या योजनांचा आर्थिक लाभ अदा न करण्याच निर्णय घेतला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत २ कोटी ६३ लाख महिलांनी अर्ज नोंदणी केली असून त्यापैकी सद्यस्थितीत २ कोटी ५२ लाख महिला पात्र ठरत आहेत, असे अदिती तटकरे म्हणाल्या.

ही योजना २१ ते ६५ वयोगटातील महिलांसाठी लागू आहे, त्यामुळे ६५ वर्षे पूर्ण करणाऱ्या महिलांचा लाभ दर महिन्याला बंद होतो. यामुळे लाभार्थ्यांची संख्या नियमितपणे बदलत असते. सध्या सुमारे १ लाख २० हजार महिलांनी वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्या योजनेतून बाद झाल्या आहेत. त्याचप्रमाणे, विवाहानंतर इतर राज्यांत स्थायिक झालेल्या महिलांचाही योजनेंतर्गत विचार केला जात नाही. राज्यातील जवळपास अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळत असल्याची माहिती त्यांनी दिली.

खानापूरच्या दरोड्यातील कोयता...

ठाण्यात दराड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ५ मार्च रोजी गुन्हयातील अज्ञात आरोपीचा तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना सदरचा गुन्हा सागर उर्फ पंकज भाऊसाहेब सोनवणे, (रा.नगदवाडी, ता.कोपरगाव) याने त्याच्या साथीदारांसह केल्याचे निष्पन्न झाले. श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीमध्ये निष्पन्न आरोपीचा शोध घेत असताना आरोपी हे श्रीरामपूर ते पढेगाव रोडने येणार असल्याची माहिती मिळाली. आरोपींचा शोध घेत असताना ते बेलापूर – पढेगाव रोडवर मिळून आले. संशयित इसमांना ताब्यात घेत असताना पथकाची चाहुल लागल्याने दोन मोटार सायकलवरून ४ इसम पळून गेले. त्याठिकाणी मिळून आलेल्या संशयित इसमांना पोलीस पथक व पंचाची ओळख सांगून त्यांनी ताब्यात घेतले.

सदर आरोपींना विश्वासात घेऊन गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी सुनील कडू पवार यांच्या सांगण्यावरून चोरी केली असल्याचे सांगितले. दरम्यान, सुनील हा भोपळे यांच्या शेतातील गडी असल्याचे पोलिसांनी सांगितले. पंचासमक्ष आरोपींची अंगझडती घेऊन त्यांच्याकडून ४ लाख २३ हजार ५०० रुपये किमतीच्या विविध प्रकारच्या धातुच्या मूर्ती, पांढऱ्या धातुचे कॉईन, बांगडी, नाकातील नथ, पांढऱ्या मण्यांचा हार, मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कामगिरी पोलीस निरिक्षक दिनेश आहेर यांच्या स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील पोसई तुषार धाकराव, पोलीस अंमलदार बापुसाहेब फोलाणे, मनोज गोसावी, गणेश भिंगारदे, संदीप दरंदले, रमीजराजा आत्तार, फुरकान शेख, मेघराज कोल्हे, प्रशांत राठोड, प्रमोद जाधव, अरूण मोरे, महादेव लगड यांनी केली. ताब्यातील आरोपीस गुन्ह्याच्या तपासकामी श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन येथे मुद्देमालासह हजर करण्यात आले आहे.

अबू आझमी निलंबित

संपेपर्यंत निलंबित करण्यात यावे. तसेच त्यांना या कालावधीत विधानभवन आवारात प्रवेशबंदी करण्यात यावी, असा प्रस्ताव पाटील यांनी मांडला. भाजपचे ज्येष्ठ आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी जुने दाखले देत केवळ अधिवेशन संपेपर्यंत निलंबन न करता त्यांचे सदस्यत्व निलंबित करावे, अशी मागणी केली. हवे तर यासाठी आमदारांची समिती नेमा तोपर्यंत त्यांचे सदस्यत्व निलंबित करा, असे मुनगंटीवार म्हणाले.

काँग्रेसचे गटनेते विजय वडेटटीवार यांनी औरंगजेबाचे समर्थन कोणी करू शकत नाही. तो नालायकच होता, अशी टीका केली. मुस्लिम लोकांमध्येही कोणी मुलाचे नाव औरंगजेब ठेवत नाहीत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी आघाडी सरकारच्या काळात भाजपाचे १२ सदस्य निलंबित झाले होते. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. तेव्हा न्यायालयाने निलंबन एका अधिवेशनापुरतेच करता येउ शकते, असा निर्णय दिल्याची माहिती सभागृहाला दिली. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आझमींच्या निलंबनाचा प्रस्ताव मतास टाकला. हा प्रस्ताव संमत झाल्याचे नार्वेकर यांनी घोषित केले. यावेळी सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी अध्यक्षांच्या समोरील जागेत येऊन आझमींच्या निषेधाच्या जोरदार घोषणा दिल्या.

कोपरगाव तालुक्यात वाळू...

जाळून नष्ट केल्या. बोटींसाठी लागणारे ८० लिटर डिझेल, जवळपास १५० मोठे पाईप व ११५ ब्रास वाळू यावेळी जप्त करण्यात आली. सायंकाळी उशिरापर्यंत ही कारवाई सुरूच होती. या कारवाईमुळे वाळूतस्करांचे धाबे दणाणले आहेत.

बाबा केदारनाथचे दर्शन घेणे...

या रोपवे प्रकल्पावर साधारण ४,०८१ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

रोपवे सार्वजनिक आणि खासगी भागीदारीत प्रकल्प विकासित करण्यात येणार आहे. हे उन्नत ट्राय केबल डिटॅचेबल गोंडोला (३ एस) प्रकल्पावर आधारित आहे. ज्याची डिझाइन क्षमता १,८०० प्रति तास असणार आहे. तर, प्रतिदिन १८,००० प्रवाशांना प्रवास करता येणार आहे. पहाडी क्षेत्रात संपर्क व वाहतूक वाढवण्यासाठी हा रोपवे म्हणजे एक महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे.

केदारनाथ मंदिरातपर्यंत जाण्यासाठी गौरीकुंडपासून १६ किमीचा रस्ता खडतर आहे. अनेक जण हा पल्ला चालत, घोडे, पालखी किंवा हेलीकॉप्टरने पूर्ण करतात. केदारनाथ हे उत्तराखंड राज्यातील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील ३,५८३ मीटर उंचीवर वसलेल्या १२ पवित्र ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. हे मंदिर अक्षय तृतीया (एप्रिल-मे) ते दिवाळी (ऑक्टोबर-नोव्हेंबर) पर्यंत वर्षभर म्हणजेच ६ ते ७ महिने यात्रेकरुंसाठी खुलं राहते. या मौसमात साधारण २० लाखाहून अधिक तीर्थयात्री येतात.

राणे आणि पवार यांच्यात खडाजंगी

विरोधी सदस्य अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत उतरले. यावेळी, सत्ताधाऱ्यांकडून गोंधळ घालून कोरटकरच्या मुद्द्यापासून पळ काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु आम्हाला या विषयापासून दूर जायचे नाही. कोरटकर, सोलापूरकरवर कारवाई झालीच पाहिजे, असे म्हणत रोहित पवार यांनी मी तुमच्या घरापर्यंत जात नाही. त्यामुळे माझ्या आजोबांबद्दल काय बोलताय, अशा शब्दांत निलेश राणे यांना ठणकावले.

कृषिमंत्री कोकाटेंच्या शिक्षेला...

अर्ज मंजूर केल्याचे बचाव पक्षाचे वकील अविनाश भिडे यांनी सांगितले. कनिष्ठ न्यायालयाने शिक्षा दिलेले मुद्दे ग्राह्य धरता येणार नाहीत. आम्हाला अपिलात यश मिळण्याची शक्यता आहे. अपिल प्रलंबित असेपर्यंत शिक्षेला स्थगिती न दिल्यास कोकाटे बंधुंचे नुकसान होईल, या बाबी न्यायालयासमोर मांडण्यात आल्याचे ड. भिडे यांनी सांगितले. शिक्षेला स्थगिती मिळाल्याने या प्रकरणात आता लोकप्रतिनिधी कायद्यातील कलम ८ (३) तरतूद तूर्तास लागू होणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

आरटीई प्रवेशासाठी आता शेवटचे चार दिवस

२ हजार १९१ जागा भरल्या

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– आरटीईंतर्गत जिल्ह्यात ५ मार्चअखेर ३ हजार २२५ पैकी २ हजार १९१ म्हणजे ६८ टक्के प्रवेश निश्चित झाले आहेत. इतर प्रवेश व्हावेत म्हणून प्रवेशाची मुदत शासनाने आता १० मार्चपर्यंत वाढवलेली आहे. ही मुदत संपण्यासाठी आता शेवटचे चार दिवस शिल्लक आहेत.

आरटीईअंतर्गत वंचित आणि दुर्बल घटकांतील बालकांना खासगी विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये आठवीपर्यंत विनामूल्य शिक्षण देण्यात येते. त्यासाठी इयत्ता पहिलीमध्ये एकूण क्षमतेच्या २५ टक्के जागांवर बालकांना मोफत प्रवेश दिला जातो. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यात आरटीईअंतर्गत एकूण ३४८ शाळांमधील ३२२५ जागांसाठी ८९८९ अर्ज आले होते. त्यातून १५ ते २८ फेब्रुवारीअखेरपर्यंत लॉटरी लागलेल्या बालकांना प्रवेश घेण्याची मुदत होती. या कालावधीत २०९१ जागांचे प्रवेश (६४ टक्के) निश्चित झाले होते. परंतु उर्वरित प्रवेश व्हावेत म्हणून १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यात ५ मार्चपर्यंत २१९१ म्हणजेच ६८ टक्के प्रवेश झाले आहेत.

मागील वर्षी आरटीईची प्रवेशप्रक्रिया लांबली होती. थेट जुलै, ऑगस्टपर्यंत प्रवेश सुरू होते. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतरही हे प्रवेश सुरूच होते. परिणामी नियमित जागांवरील प्रवेश झाल्याने शैक्षणिक सत्रही सुरू झाले. त्यामुळे अनेक आरटीई विद्यार्थ्यांना या प्रवेशापासून मुकावे लागले. त्यामुळे यंदा ही प्रवेशप्रक्रिया जानेवारीपासूनच राबविली जात आहे. त्यामुळे यंदा वेळेत म्हणजे एप्रिलच्या आधीच सर्व प्रवेश पूर्ण होणार आहेत.

प्रत्येक विद्यार्थ्यामागे शाळांना १७,६७० रूपये

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीचा दर शालेय शिक्षण विभागाने निश्चित केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षासाठी प्रतिविद्यार्थी १७ हजार ६७० रूपये या दराने शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. यंदाच्या प्रवेशाचे शुल्क पुढील वर्षी मिळणार आहे.

प्रतिपूर्ती मिळण्यात होतो उशीर

शासनाकडून शाळांना मिळणारी प्रतिपूर्ती रक्कम मिळण्यात अनेकदा उशीर होतो. त्यामुळे काही शाळा आरटीईचे प्रवेश देण्यास टाळाटाळ करतात. शासनाकडून जिल्हा परिषदेला व तेथून थेट शाळांच्या खात्यात ही रक्कम जाते.

परिपूर्ण विद्यार्थी घडविणे हा प्रवरेचा ध्यास- डॉ. दिघे

राहाता (प्रतिनिधी)– ग्रामीण विद्यार्थ्यांकडे कलागुण असतात. त्याला व्यासपीठ देण्याचे काम शालेय पातळीवर होत असते. प्रवरा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून परिपूर्ण विद्यार्थी घडविणे हा प्रवरेचा ध्यास असून यासाठीच प्रवरा नेहमीच कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे यांनी केले.

सिंधू कॅम्पस चिंचोली (ता. सिन्नर) येथील डॉ. बाळासाहेब विखे पाटील इंग्लिश मीडियम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरणात ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, डॉ. राणा महाजन, प्राचार्य डॉ. सुनीता बारी, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभाग प्रमुख राहुल सोनटक्के, वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. राहुल भंडारी, कैलास तांबे, प्राचार्य विजय आहेर आदी उपस्थित होते.

डॉ. सुष्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून वार्षिक संम्मेलन दरवर्षी वेगवेगळ्या पद्धतीने कलागुणांना संधी देणारे ठरत असते. यावर्षी भारताची सांस्कृतिक परंपरा या विषयावर विविधतेने नटलेला देश आहे. विविध राज्यांमध्ये साजरे होणारे सण आणि उत्सव हे भारत देशाच्या विविधतेतून एकतेचा संदेश देतात याची अनुभूती विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या अविष्कारातून झाली. महाराष्ट्र, आसाम, दक्षिण भारत, कर्नाटक, उत्तर प्रदेश इत्यादी राज्यांमध्ये साजरे होणारे मकर संक्रांती, बैसाखी, बिहू बनालू, गुढीपाडवा, पुनम, लोहारी, दिवाली, दुर्गा पुजा, राम नवमी, ख्रिसमस इत्यादी सणांवर आधारित नृत्याविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले. यशस्वी यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुनीता बारी यांनी वार्षिक अहवालाचे सादर केला. स्नेहल पाटोळे, श्रेया शिरसाठ आणि समन्वयक प्रशांत धिवरे यांनी आभार मानले.

कुसूमबाई पटारे यांचे निधन

भोकर(वार्ताहर)– श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील प्रगतिशील शेतकरी कुटुंबातील गं. भा. कुसूमबाई मारूती पटारे (वय ७८) यांचे काल रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचेवर आज सकाळी १० वा. भोकर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे व परतवंडे असा परिवार आहे. येथील बांधकाम मटेरियल व्यावसायिक दिनकरराव पटारे, भोकर विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन व काँग्रेस सेवा दलाचे तालुकाध्यक्ष सुदामराव पटारे यांच्या त्या मातोश्री होत. तसेच निवारा ट्रेडींगचे संग्राम पटारे यांच्या त्या आजी होत.